**रे.दि.मू.नं. १०२/२००८ मधील नि. ८६ खालील आदेश**
**( बाबू भिंगारे विरूध्द मधुकर पवार )**
**(आदेश पारीत दि. १०/०८/२०१८)**

नि. ८६ वरील प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. ३ यांनी त्यांचे विरूध्द झालेला उलटतपास नाही (No cross) चा आदेश रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल केले आहे.

२. अर्ज, म्हणणे याचे अवलोकन केले. नि. ८६ मध्ये नमूद केलेली कारणे व त्यास वादीने दिलेले म्हणणे विचारात घेता वादी व प्रतिवादी यांचेमधील अंतिम वाद निकाली काढणेकरिता प्रतिवादी नं. ३ विरूध्द झालेला उलटतपास नाही (No cross) चा आदेश रद्द करणे व त्यांना उलटतपास घेणेस संधी देणे न्यायोचित वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ८६ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी नं. ३ विरूध्द झालेला उलटतपास नाही (No cross) चा आदेश रक्कम रूपये ५००/— चे कॉस्टवर रद्द करणेत येतो.

३. सदरची रक्कम प्रतिवादी नं. ३ यांनी वादी यांना द्यावी.

४. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. १०/०८/२०१८**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**